# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ११७ /२०२३ दि. १८ /०८/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातर्गत कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निळजे गावाजवळ डी.एफ.सी.सी. रेल्वे लाईन टाकण्याचे काम चालू आहे. त्यामुळे Dedicated Freight Corridor Project (JNPT – Vaitarana Section of Western 3 Corridor Phase - 2), Civil, Building and track work Package – CTP – 11 या कंपनी मार्फत DFCCIL RUB 104A & RUB 106A चे रूंदीकरण करण्यात येणार आहे. सदर कामामध्ये RUB 106A चॅनेज न. ४२ + ८८९ मध्ये लोढा पलावा ते निळजे गाव अतर्गत अंडरपासचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्या दरम्यान रेल्वे बोगदा वाहतुकीस बंद करून सदर वाहतूक निळजे गाव रेल्वे फाटक मार्गे चालू ठेवण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद :–** १) घेसरगाव, नारीवली गाव, वडवली गाव कडून लोढा हेवन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेल्वे बोगद्याजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने रेल्वे बोगदा जवळून सरळ पुढे निळजे रेल्वे ट्रॅक समांतर रस्त्याने पुढे जावून डावे वळण घेवून निळजे रेल्वे फाटक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** २) लोढा हेवन कडून घेसरगाव, नारीवली गाव, वडवली गाव कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **कासारीओ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने काळुबाई चौकातून डावे वळण घेवून निळजे रेल्वे फाटक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. १८/०८/२०२३ पासून वर नमूद काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.